**वाचले :-** १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३
२) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र कास/२/कावि/२२/२०१७ दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय
३) आदेश क्र. लेखा/३/कावि/१३३/२०२० दि. १८/०५/२०२०
४) भारत सरकार,वित्त विभागाचे पत्र क्र. १/५/२०२४- E.II(B) दि.२१/१०/२०२४
५) कर्मचारी महासंघ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि.२२/१०/२०२४ चे पत्र
६ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ८/ १० / २०१८ चा मान्य प्रस्ताव
७ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक२५ / ११ / २०२४ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/१२३६ /२०२४
दिनांक :- २५ / ११ /२०२४

**विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२४ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...**

**आदेश,**

केंद्रशासनाच्या वित्त मंत्रालय खर्च विभागाकडील ज्ञापन क्रमांक १/५/२०२४ E.II(B) दि.२१/१०/२०२४ अन्वये केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२४ पासून ५० टक्के वरुन ५३ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२४ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा.नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जुलै २०२४ पासून सातवा वेतन आयोगानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता ५० टक्के ऐवजी ५३ टक्के लागू करण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २०२४ चे वेतन व पेन्शन बिल ५३ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. माहे जुलै २०२४ ते माहे ऑक्टोंबर २०२४ अखेरची महागाई भत्त्याची थकबाकी माहे नोव्हेंबर २०२४ चे वेतन देयके / पेन्शन देयका बरोबर काढण्यात यावी.

सही/-
**( शेखर सिंह )**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

**प्रति,**

**सर्व संबंधित विभाग प्रमुख**

**( प्रविण जैन )**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**तथा संचालक (वित्त )**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८